CMYK

बीड । शुक्रवार
०९.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ३८
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# भारताचे पाकिस्तानवर जोरदार हल्ले; लाहोर, सियालकोट, फैसलाबादमधील संरक्षण प्रणाली उद्ध्वस्त

**नवी दिल्ली**

भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने अचानक भारतावर हल्ले सुरू केले असून, भारतही जोरदार प्रत्युत्तर देत आहे. विशेष म्हणजे, भारताने पाकिस्तानच्या लाहोर आणि सियालकोटवरही हल्ले सुरू केले आहेत. पाकिस्तानने भारतातील जम्मू, पंजाब, राजस्थानमध्ये केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने लाहोर आणि सियालकोटवर क्षेपणास्त्र डागली आहेत.

सविस्तर माहिती अशी की, गुरुवारी अंधार पडताच पाकिस्तानने सीमेजवळील भारतातील विविध शहरांमध्ये १०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. पाकिस्तानने फक्त राजस्थानच्या जैसलमेरमध्ये ७० हून अधिक क्षेपणास्त्र हल्ले केले. मात्र, भारताच्या हवाई




संरक्षण यंत्रणेने पाकिस्तानची सर्व क्षेपणास्त्रे हवेतच हामून पाडली. मीडिया रिपोर्सनुसार, प्रत्युत्तरात भारताने लाहोरमध्ये असलेले पाकिस्तानचे AWCS (एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टम) नष्ट केले आहे. याशिवाय भारताने पाकिस्तानच्या फैसलाबाद, सरगोधा, मुलतान आणि सियालकोट शहरांमधील संरक्षण ▶▶ उर्वरित पान २ वर

### • पाकिस्तानची ३ विमाने पाडली, पायलट ताब्यात

पाकिस्तानी हवाई दलाने भारतीय हद्दीत घुसून हल्ले करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय सैन्याने पाकची ३ लढाऊ विमाने पाडली. भारताने पाडलेल्या पाकिस्तानच्या लढाऊ विमानांमध्ये दोन JF १७ आणि एक F-१६ यांचा समावेश आहे. तसेच, यापैकी एका विमानातील पाकिस्तानी वैमानिकाला पकडण्यात आल्याची माहितीही मिळत आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम



**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे उद्या शुक्रवार दि. ९ मे २०२५ रोजी बीड जिल्हयाच्या दौ-यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे. सकाळी ११.१५ वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथून हेलीकॉप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी ११.४५ वाजता आदिनाथ शास्त्री महाराज तारकेश्वरगड येथील हेलीपॅड वर आगमन व मोटारीने तारेश्वरकडे प्रयाण. दुपारी १२.०० वाजता तारकेश्वरगडाचे संस्थापक श्री नारायण ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाकिस्तानी कंटेंट तात्काळ बंद करा; केंद्राचे ओटीटी आणि मीडिया प्लॅटफॉर्मना कडक निर्देश

**नवी दिल्ली**

राष्ट्रीय सुरक्षेसाठी पाकिस्तानी कंटेंट तात्काळ बंद करण्याचे निर्देश केंद्र सरकारने ओटीटी, मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मना दिले आहेत. पहलगाममधील क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानविरुद्ध सात्यत्याने कठोर पावले उचलत असून, ७ मे च्या रात्री भारताने पाकिस्तानमधील अनेक दहशतवादी तळांवर हल्ला केला. यापूर्वी, भारत सरकारने भारतातील अनेक पाकिस्तानी सेलिब्रिटींच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर बंदी घातली होती. त्यानंतर आता राष्ट्रीय सुरक्षेसाठी पाकिस्तानी कंटेंट तात्काळ बंद करण्याचे निर्देश केंद्र सरकारने ओटीटी, मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मना दिले आहेत

**केंद्राचे निर्देश नेमके काय?**

भारत आणि पाकिस्तानमध्ये वाढत्या ▶▶ उर्वरित पान २ वर




## 10 वीच्या निकाल संदर्भात मोठी अपडेट

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इयत्ता १२ वीचा निकाल ५ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आला. या निकालानंतर आता सर्वांचे लक्ष १० वीच्या निकालाकडे लागले आहे. विद्यार्थी आणि पालक दोघेही दहावीच्या निकालाची उत्सुकतेने वाट पाहत आहेत. १२ वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर काही दिवसांतच १०



वीचा निकाल जाहीर होतो, हा गेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी जवानाला बॉर्डरवर बोलवलं, नववधू म्हणाली, 'ऑपरेशन सिंदूरसाठी कुंकू पाठवलंय'

**जळगाव । प्रतिनिधी**

प्रत्येक नवविवाहित जोडप्याला सुखी संसाराची अपेक्षा असते. लग्नानंतर फिरायला जाणे आणि आनंदाने जीवन जगणे हे सगळ्यांनाच हवे असते. पण जवान मनोज पाटील यांच्या बाबतीत वेगळे घडले. ५ मे रोजी त्यांचे लग्न झाले आणि अवघ्या तीन दिवसांत, ८ मे रोजी त्यांना तातडीने देशसेवेसाठी हजर राहण्याचा आदेश आला. कोणताही विचार न करता, मनोज पाटील आपल्या अंगावरची हळद आणि हातावरची मेहंदी



तशीच ठेवून (८ मे) कर्तव्यासाठी रवाना झाले. देशात तणावपूर्ण परिस्थिती असल्याने जवानांना त्वरित बोलावण्यात आले आहे. जवानांनीही आपल्या वैयक्तिक स्वप्नांपेक्षा ▶ उर्वरित पान २ वर

## नशेचे इंजेक्शन, बिअर पाजून महिलेवर सामूहिक अत्याचार, राजकीय पुढाऱ्याचा ही समावेश

**कल्याण । प्रतिनिधी**

ड्रग्जचे इंजेक्शन आणि बिअर पाजून एका तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना कल्याणनजीक टिटवाळा परिसरात घडली आहे. टिटवाळा पोलिसांनी एका राजकीय पक्षाच्या नेत्यासह सात जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत. या सामूहिक अत्याचाराच्या घटनेनं खळबळ उडाली आहे. शिवाय कल्याण डोंबिवली अशा घटना वाढल्याने चिंताही व्यक्त केली जात आहे.

पिडीत तरुणी ही टिटवाळा परिसरातील बल्याणी येथे आजी आणि चुलत बहिणीसोबत राहते. १९ मार्च रोजी दहा वाजताच्या सुमारास या तरुणीचा आजी सोबत किरकोळ वाद झाला. त्यानंतर रात्री ११ वाजत्या सुमारास तरुणी तिची मैत्रीण जिनत कुरेशी हिच्या घरी गेली. त्यावेळी मैत्रीणीच्या घरात पती इरफान कुरेशी, मुलगा आणि शबनम शेख हे होते. जीनतच्या शेजारीच तरुणीची दुसरी मैत्रीण शबनम शेख



ही देखील राहते. काही दिवस तरुणी ही जिनत आणि शबनमच्या घरात राहिली. २५ मार्च रोजी सकाळी साडे आकरा वाजताच्या सुमारास शबनम आणि जिनत यांनी बल्याणी परिसरात राहणारे गुड्ड अब्दुल रहीम याला बोलावून घेतले.

१२ वाजताच्या सुमारास गुड्डू त्याची काळ्या रंगाची गाडी घेऊन आला. एनआरसी कंपनीच्या मागे सुरु असलेल्या चाळीचे काम पाहण्यासाठी जायचे आहे असे सांगून त्याने ▶▶ उर्वरित पान २ वर

## महिलांना मिळणार मोफत पिठाची गिरणी; लाभार्थी होणार आत्मनिर्भर

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोफत पीठ गिरणी योजना सुरू केली आहे. या योजने अंतर्गत महिलांना मोफत पिठाची गिरणी मिळते. यातून त्यांना स्वतः चा व्यवसाय सुरू करता येतो. आर्थिक अडचणीत असलेल्या महिलांना मदत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोफत पीठ गिरणी




योजना २०२४ मध्ये सुरू केली आहे. ही योजना या महिलांना मोफत पिठाच्या गिरण्या आणि त्यांना स्वतःचा छोटासा व्यवसाय सुरू ▶▶ उर्वरित पान २ वर

## संतोष देशमुख हत्या प्रकरण खटला

### न्यायाधीश रजेवर, सरकारी वकील निकमांसह आरोपीच्या वकिलाचीही अनुपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारण खळबळ उडवून देणाऱ्या बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्या खटल्याची सुनावणी, ज्या न्यायाधीशांसमोर होती, ते रजेवर होते. याशिवाय सरकारी पक्षाचे विशेष वकील उज्ज्वल निकम, या



घटनेतील मुख्य आरोपी वाल्मिक कराड यांचे वकील विकास खाडे देखील गैरहजर होते.

न्यायाधीश पाटोदकर रजेवर असल्याने या खटल्याची सुनावणी विशेष न्यायाधीश शिंदे यांच्यासमोर झाली. उज्ज्वल निकम यांच्याऐवजी त्यांच्याकडून सहायक सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे हजर होते. या खटल्याची सुनावणी पुढं १९ मे रोजी होणार आहे. बीड मस्साजोग इथला संतोष देशमुख हत्या प्रकरणाला १४० पेक्षा अधिक दिवस झाले. या हत्येतील मुख्य आरोपी ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाकिस्तानच्या पंतप्रधानांचा दावा, 'आम्ही भारताची ५ विमानं पाडली, त्यापैकी ३ राफेल विमाने होती'



**वृत्तसंस्था**

भारतीय सैन्यानं पाकिस्तानात ७ मेच्या पहाटे नऊ ठिकाणी हल्ला केल्याचं भारत सरकारनं सांगितलं. त्यानंतर दोन्ही देशांकडून याविषयी माहिती देण्यात येत आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्लीमध्ये भाषण केलं. तेव्हा ते म्हणाले, पाकिस्तानचं सैन्य या हल्ल्याला तोंड देण्यासाठी आधीपासूनच तयार होतं. भारतानं खरेदी केलेल्या राफेल विमानावर खूप गर्व केला, पण गर्व करायचा नसतो. हवाई दल प्रमुख जहिर बाबर यांचं मी अभिनंदन करतो की त्यांनी भारताच्या राफेल विमानांचं ▶▶ उर्वरित पान २ वर

## सद्‌गुरु बंकट स्वामी महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**नेकनूर । प्रतिनिधी**

सद्‌गुरू बंकट स्वामी महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले तसेच लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम बंकट स्वामी महाराज यांनी केले. असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

श्री क्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाला भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी



व्यासपीठावर ह.भ.प. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, संभाजी महाराज आगळे, भास्कर महाराज शिंदे, ह.भ.प.स्वामी प्रकाशानंद गिरी महाराज, ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, दिनकर कदम, अरुण डाके. विलास बडगे, नानासाहेब काकडे, भारत काळे, राजाभाऊ



शेळके, सखाहरी गदळे, महेंद्र फटाणे, बाजीराव काळे, गणेश पाटील, अभिमान शिंदे, राजाभाऊ शेळके, पोपट मते, चक्रधर शिंदे, अभिमन्यू काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीक्षेत्र नेकनूर येथे सुरू असलेल्या संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त केले पुढे बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्रात काकडा भजन, किर्तन परंपरेला समृद्ध करण्याचे श्रेय संत बंकस्वामी महाराज यांना जाते त्यांनी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे २४ वर्ष अध्यक्षपद भूषवले. लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम बंकट स्वामी महाराज यांनी केले. संत वामन भाऊ, संत भगवान बाबा यांना ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# अहंकारावर नियंत्रण ठेवून आपण समाधानी जीवन जगूया

अहंकार ही एक मानसिक आरोग्य स्थिती आहे, जी व्यक्तीच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणावर प्रभाव करते. ते काही प्रमाणात प्रेरणादायी आहे, परंतु त्याची सतत वाढ अनेक समस्यांना कारणीभूत ठरते, जे केवळ स्वतःचेच नाही तर त्याच्या सभोवतालच्या लोकांचेही जीवन विस्कळीत करते. फक्त स्वार्थाबद्दल किंवा मी आणि माझा विचार केल्याने आपण मानसिक शांती समाधानापासून दूर जातो. इतिहास साक्षी आहे की या अहंकारामुळे राजे-महाराजे, सत्ता, राज्य, कीर्ती, संपत्ती गेली. बहुतेक युद्धांचे मुख्य कारण अहंकार राहिला होता, अहंकारामुळे दररोज असंख्य आयुष्ये उद्ध्वस्त होतात आणि या अहंकारामुळेच लोक रागाच्या भरात चुकीचे निर्णय घेतात आणि जीवनातील शांती आणि आनंद हिरावून घेतात. आपले लहानशे जीवन मौल्यवान आहे, आपण ते मोकळेपणाने आणि शांततेने जगले पाहिजे. ते निराशा, भीतीत आणि रागात वाया घालवू नये, वेळ निघून गेल्यावर आयुष्यात पश्चातापाशिवाय काहीही उरत नाही. संशोधनातून असे दिसून आले आहे की आपल्या बहुतेक दुःखांचे कारण अदृश्य अहंकारी मन असते,

ज्यामध्ये श्रेष्ठता, कनिष्ठता,

पूर्वग्रह, इतरांचे स्वतःच मूल्यमापन करणे, हाताळणी, राग, मत्सर, भीती, संताप, व्यसन, ताण, हिंसाचार, वंशवाद, लिंगभेद, प्रशंसा, मान्यता, प्रतिक्रियावादीपणा, सहानुभूतीचा अभाव, एकटेपणा, निराशा, प्रचार, धार्मिक आणि जातीचे युद्धे इत्यादी खोट्या भावनांचा समावेश आहे. जागतिक अहंकार जागरूकता दिन दरवर्षी ११ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. या मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या सर्वांना मदत करण्यासाठी आणि इतरांना या अदृश्य स्वरूपाच्या गैरवापराचे परिणाम अनुभवण्यापासून रोखण्यासाठी २०१८ मध्ये अहंकार जागरूकता चळवळ आणि जागतिक अहंकार जागरूकता दिनाची स्थापना करण्यात आली. या दिवसाचे उद्दिष्ट अहंकाराशी संबंधित मुद्द्यांवर प्रकाश टाकणे, सर्वांना जागरूक राहण्यास, जागरूकता वाढविण्यास आणि स्वकेंद्रित किंवा अहंकारी वर्तनाविरुद्ध बोलण्यास प्रोत्साहित करणे आहे. अहंकारामुळे राग, पूर्वग्रह आणि हिंसाचार यासारख्या नकारात्मक वर्तनांना कसे जन्म मिळू शकतो हे समजून घेणे हे त्याचे ध्येय आहे. हा दिवस राग, संताप आणि हिंसाचार यासारख्या अहंकाराने प्रेरित वर्तनाचे नकारात्मक परिणाम अधोरेखित करतो आणि व्यक्तींना अशा प्रवृत्तींना आव्हान देण्यासाठी आणि त्यांच्यावर मात करण्यासाठी प्रोत्साहित करतो. अहंकार ह्या मानसिक अवस्थेवर प्रत्येकाने मात केली पाहिजे. अहंकार निरोगी आणि अस्वस्थ दोन्ही असू शकतो; निरोगी अहंकार एखाद्या व्यक्तीला स्वतःची ताकद आणि कमकुवतपणा समजून घेण्यास मदत करते, ज्यामुळे अधिक वास्तववादी ध्येये आणि अधिक सकारात्मक स्व-प्रतिमा निर्माण होते, जी प्रेरणा आणि लवचिकतेसाठी महत्त्वाची असू शकते. आपल्या विचारांवर, भावनांवर आणि वर्तनांवर नियमितपणे चिंतन केल्याने आपल्याला ओळखण्यास मदत होते की आपला अहंकार आपल्या निर्णय घेण्यावर कधी प्रभाव पाडत आहे, तर इतरांचे दृष्टिकोन समजून घेणे आणि स्वीकारणे आपल्याला आपल्या अहंकारावर नियंत्रण ठेवण्यास आणि त्यांच्या प्रेरणांबद्दल गृहीत धरणे टाळण्यास मदत करू शकते. स्वतःमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्याने आपल्याला अधिक सुरक्षित आणि निरोगी अहंकार निर्माण करण्यास मदत होऊ शकते. निरोगी अहंकार असलेले व्यक्ती कठीण परिस्थितींना चांगल्या प्रकारे तोंड देण्यास सक्षम असतात, ताणतणावाला रचनात्मक पद्धतीने तोंड देण्याची त्यांची क्षमता वाढवतात, सक्रिय सामना करण्याच्या धोरणांचा वापर करण्यास प्रोत्साहन देतात.

## पान १ वरून पुढे...

### भारताचे पाकिस्तानवर...

प्रणालीदेखील नष्ट केली आहे. पाकिस्तानच्या प्रत्येक नापाक कारवाईला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताच्या सर्व संरक्षण यंत्रणा सध्या पूर्णपणे सक्रिय असून, पाकिस्तानच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

### उपमुख्यमंत्री एकनाथ...

महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त उत्सवास उपस्थिती, स्थळ तारकेश्वरगड, जि. बीड दुपारी १२.४५ वाजता आदिनाथ शास्त्री महाराज तारकेश्वरगड येथील हेलीपॅडकडे प्रयाण व दुपारी १.०० वाजता हेलीकॉप्टरव्दारे पुणेकडे प्रयाण.

### पाकिस्तानी कंटेंट...

तणावाच्या परिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा महत्त्वाची आहे. हीच बाब लक्षात घेत माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने ओटीटी प्लॅटफॉर्म आणि मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मना तात्काळ पाकिस्तानमधील सर्व प्रकारचा प्रसारित होणारा कंटेट भारतात दाखवणे बंद करण्याचे निर्देश दिले आहेत केंद्राच्या या निर्देशानंतर आता भारतात ओटीटी प्लॅटफॉर्म, यूट्यूब आणि सर्व प्रकारच्या ऑडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर पाकिस्तानमध्ये बनवलेल्या सर्व प्रकारच्या कंटेंट दिसणार नाहीये. भारतातच्या या निर्णयामुळे पाकिस्तानी कलाकारांना मोठा दणका बसणार आहे. राष्ट्रीय सुरक्षेचा विचार करून, सर्व ओटीटी प्लॅटफॉर्म, मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म आणि मध्यस्थांना पाकिस्तानमध्ये बनवलेल्या वेब सिरीज, चित्रपट, गाणी, पॉडकास्ट आणि इतर स्ट्रीमिंग मीडिया कंटेंट, जे सबस्क्रिप्शन किंवा इतर कोणत्याही माध्यमातून उपलब्ध आहेत, त्वरित बंद करण्याचे सांगण्यात आले आहे.

### 10 वीच्या...

काही वर्षांचा अनुभव आहे. त्यामुळे दहावीचा निकाल १५ मे २०२५ पूर्वी जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, अद्याप मंडळाकडून कोणतीही अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.

परीक्षेची माहिती आणि संभाव्य निकालाची तारीख : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा यंदा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ दरम्यान झाली. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन ३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात आले. त्यामुळे पेपर तपासणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची शक्यता आहे. शिक्षण मंडळाकडून संकेत देण्यात आले आहेत की निकाल जाहीर करण्याआधी अधिकृत वेबसाईटवर यासंदर्भात माहिती प्रसिद्ध केली जाईल. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांनी mahresult.nic.in या संकेतस्थळावर नियमितपणे भेट देत राहणे गरजेचे आहे.

कुठे आणि कसा पाहता येईल निकाल ? : mahresult.nic.in, www.mahahsscboard.in, mahahsscboard.org, hscresult.mkcl.org निकाल पाहण्यासाठी mahresult.nic.in या अधिकृत वेबसाईटवर गेल्यानंतर SSC Result 2025 या लिंकवर क्लिक करावे लागेल. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपला रोल नंबर आणि आईचे नाव टाकून निकाल पाहता येईल. सबमिट करताच निकाल स्क्रीनवर दिसेल आणि तो प्रिंट किंवा डाऊनलोड सुद्धा करता येईल.

### लग्नाच्या दुसऱ्याच...

देशाच्या कर्तव्याला अधिक महत्त्व देत ८ मे रोजी सीमेवर जाण्याचा निर्णय घेतला. लग्नाची सुंदर स्वप्ने, पत्नीसोबत फिरण्याचे बेत आणि भविष्याच्या योजना बाजूला सारून, ५ मे रोजी विवाहबंधनात अडकलेले मनोज ज्ञानेश्वर पाटील (रा. खेडगाव नंदीचे) हे आपल्या अंगावर हळदीचा रंग असतानाच देशासाठी सीमेवर निघाले आहेत. नाशणखेडे (ता. पाचोरा) येथील रामचंद्र पाटील यांची मुलगी यामिनी हिच्याशी खेडगाव नंदीचे येथील ज्ञानेश्वर लुभान पाटील यांचा मुलगा मनोज याचे लग्न ठरले होते. लग्नासाठी सुट्टी घेऊन मनोज गावी आले होते. पाचोरा येथे विवाह सोहळा नुकताच पार पडला आणि लगेचच मनोज यांना कर्तव्याच्या ठिकाणी तातडीने रुजू होण्याचा आदेश आला.

'देशापेक्षा मोठे काहीही नाही' - कुटुंबासोबत लग्नाचा आनंद साजरा करत असतानाच देशसेवेसाठी जाण्याचा मनोज यांना अभिमान आहे. 'देशापेक्षा मोठे काहीही नाही,' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. मनोज यांची पत्नी यामिनी यांनीही या कठीण परिस्थितीत देशसेवेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले. 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर सरकारने सर्व जवानांच्या सुट्ट्या रद्द केल्यामुळे, घरी परतलेल्या जवानांना पुन्हा आपल्या कर्तव्यावर जावे लागत आहे. यातच स्वतःच्या लग्नासाठी सुट्टीवर आलेले मनोजदेखील हातावरची मेहंदी आणि अंगावरची हळद अशा स्थितीत आज देशासाठी रवाना झाले आहेत. त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### नशेचे इंजेक्शन...

या तरुणीला त्या ठिकाणी नेले. यावेळी गुलफाम नावाचा तरुण देखील होता. आधी तरुणीला सांगितले गेले की, तुला घरी सोडू नंतर एनआरसी येथील चाळीतील घर बघण्यासाठी जाऊ. तसे न करता त्यानी त्यांची गाडी एनआरसी कंपनीकडे वळविली. घर दाखविण्याच्या बहाण्याने त्यांनी तिला एका घरात नेले. तिला तिथे ड्रग्जचे इंजेक्शन आणि बिअर पाजली. तरुणी शुद्धीवर आली, तेव्हीं ती कल्याणच्या रामबाग परिसरातील रेस्ट हाऊसमध्ये होती. इंजेक्शनची नशा असल्याने ती पुन्हा झोपी गेली. तिला दुसऱ्या दिवशी जाग आली. तिच्या अंगावर कपडे नव्हते. समोर लियाकत शेख नावाचा एका राजकीय पक्षाचा पदाधिकारी उभा होता. नंतर तिला परत नशेचे इंजेक्शन दिले. चार ते पाच दिवस तिला शुद्ध नव्हती. त्या काळात तिच्या सोबत गैरकृत्य करण्यात आल्याचा तिचा आरोप आहे. पिडीत तरुणीने हा प्रकार जिनत हिला सांगितला. तेव्हा जिनतने तिला हा प्रकार कोणाला सांगू नको, तुला फाशी देऊन मारु अशी धमकी दिली. शिवाय तुझ्या घरच्यां विरोधात खोटी तक्रार दे असे देखील तिला बजावले. सातत्याने दहा दिवस या तरुणीवर लियाकत शेख हा अत्याचार करीत असल्याचा आरोप तरुणीने केला आहे. एका घरात ठेवून पिडीत तरुणीला शुद्ध आल्यावर तिने घराच्या खिडकीतून आरडाओरड सुरु केली. एक व्यक्ती मदतीस आला. बाहेरचे कुलुप तोडून त्या तरुणीला त्या व्यक्तीने बाहेर काढले. तिला घरी सोडण्यात आले. घरी आल्यावर ही सगळी हकीगत तिने तिच्या आजीला सांगितली. या प्रकरणात टिटवाळा पोलिस ठाण्यात तक्रार केली. टिटवाळा पोलिसांनी पिडीत तरुणीच्या फिर्यादीनुसार शबनम शेख, जीनत , गुड्डी, गुलफाम, लियाकत अली. एक अज्ञानत व्यक्ती आणि अली इराणी यांच्या विरोधात सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

### महिलांना मिळणार...

करता येतो. महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती आणि जमातीतील महिलांना पिठाची गिरणी खारेदी करण्यासाठी अनुदान देत आहे. या योजनेमुळे महिलांना स्वतः चा व्यवसाय सुरू करण्यास मदत मिळते आहे. या योजनेमुळे कमी भांडवल गुंतवावे लागते. पिठाची गिरणी हा असा व्यवसाय आहे, ज्यामध्ये कमी गुंतवणुकीत चांगला नफा मिळवता येतो. ग्रामीण भागात दररोज धान्य दळण्याची गरज असते. त्यामुळे हा व्यवसाय वर्षभर चालू राहतो. या योजने अंतर्गत महिलांना गिरणी खरेदीसाठी ९०% सरकारी अनुदान दिले जाते. म्हणजेच महिलांना फक्त १०% रक्कम भरावी लागते. यामुळे अगदी कमी खर्चात व्यवसाय सुरू करता येतो. विशेषतः आदिवासी आणि मागासवर्गीय महिलांसाठी ही योजना फायदेशीर आहे.

मोफत पिठाची गिरणी योजनाची उद्दिष्टे- महिलांचे आर्थिक सक्षमीकरण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवून त्यांचे सशक्तीकरण करणे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना ग्रामीण भागात लघु उद्योगांना प्रोत्साहन देऊन स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे. रोजगार निर्मिती महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे. सामाजिक समता अनुसूचित जाती आणि जमातीतील महिलांच्या आर्थिक विकासाला चालना देऊन सामाजिक समता आणणे. कोटुंबिक उत्पन्न वाढवणे महितांच्या उत्पन्नातील वाढीमुळे कुटुंबाचे एकूण उत्पन्न वाढवणे

योजनेचे पात्रता निकष काय ? 'अर्जदार महिला महाराष्ट्राची रहिवासी असावी. अर्जदार महिलेचे वय १८ ते ६० वर्षे दरम्यान असावे. महिला अनुसूचित जाती किंवा जमातीमधील असावी. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १.२० लाख रुपयांपेक्षा कमी असावे. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना प्राधान्य दिले जाईल. अर्जदार महिलेच्या नावे बँक खाते असणे आवश्यक आहे. योजनासाठी आवश्यक कागदपत्रे- अर्जदार महिलेच्या आधार कार्डची प्रत 'अनुसूचित जाती किंवा जमातीचे प्रमाणपत्र. कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला. कुटुंबाच्या रेशन कार्डची प्रत. 'महाराष्ट्राचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र. बँक खात्याचा तपशील पासबुक किंवा बँक स्टेटमेंटची प्रत. अर्जदार महिलेचा अलीकडील फोटो. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र (असल्यास): इझङकार्डची प्रत. कोटेशनः पिठाची गिरणी खरेदी करण्यासाठी शासनमान्य विक्रेत्याचे कोटेशन.

येथे करा अर्ज- अर्जदार महिलेने स्थानिक पंचायत समिती किंवा जिल्हा महिला व बालकल्याण विभागाच्या कार्यालयात जाऊन अर्ज भरावा. सर्व आवश्यक माहिती भरून अर्ज पूर्ण करावा. वर नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत. पूर्ण भरलेला अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह संबंधित कार्यालयात सादर करावा. अर्जाची पडताळणी केली जाईल आणि पात्रता तपासली जाईल. अर्ज मंजूर झाल्यास, संबंधित महिलेला अनुदान मंजूर केले जाईल. मंजूर अनुदान थेट अर्जदार महिलेच्या बँक खात्यात जमा केले जाईल. पिठाची गिरणी व्यवसायाचे फायदे - ग्रामीण भागात पिठाच्या गिरणीची गरज वर्षभर असते, त्यामुळे नियमित उत्पन्न मिळू शकते. सरकारी अनुदानामुळे महिलांना अत्यंत कमी गुंतवणुकीत व्यवसाय सुरू करता येईल. पिठाची गिरणी चालविण्यासाठी विशेष तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता नाही. दररोज धान्य दळण्याची स्थानिक गरज असल्याने व्यवसायाला मागणी असते. हिंगोली येथील जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने २०२४-२५ या वर्षात जि. प. सेस व विशेष घटक योजनेतून १०६ लाभार्थ्यांना पिठाच्या गिरणीचे वाटप करण्यात आले. पिठाच्या गिरणीमुळे लाभार्थी आत्मनिर्भर बनले आहेत.

### संतोष देशमुख...

कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. पोलिस प्रशासनाने त्याला वॉंटेड म्हणून जाहीर केले आहे. देशमुख हत्या प्रकरणातील दुसरा मुख्य आरोपी वाल्मिक कराड आणि त्याचे साथीदार बीडच्या तुरुंगात आहे. या प्रकरणाची सुनावणी बीड येथील विशेष न्यायालयात सुरू आहे. या खटल्याची आज चौथी सुनावणी विशेष न्यायालयासमोर होणार होती. विशेष न्यायाधीश पाटोदकर रजेवर होते. त्यामुळे या खटल्याच्या सुनावणीचे प्रकरण विशेष न्यायाधीश शिंदे यांच्यासमोर देण्यात आले. मात्र न्यायाधीश शिंदे यांनी सुनावणीची थेट पुढची तारीख १९ मे रोजीची दिली.

पुढची सुनावणी १९ मे रोजी- न्यायाधीश रजेवर असतानाच, या खटल्याचे सरकारी पक्षाचे वकील उज्वल निकम देखील अनुपस्थित होते. उज्व निकम यांनी त्यांच्या जागी सहायक सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे हजर होते. आरोपी वाल्मिक कराड याचे वकील विकास खाडे देखील गैरहजर होते. आरोपी विष्णू चाटे यांचे वकील राहुल मुंडे देखील हजर होते. या खटल्याची पुढची सुनावणी १९ मे रोजी होणार आहे

कृष्णा आंधळे फरारच...संतोष देशमुख यांचे अपहरण करून ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृण हत्या झाली. या हत्येत बीडचे आमदार धनंजय देशमुख यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हा मुख्य सूत्रधार निघाल्याने त्याला आणि त्याच्या साथीदारांना अटक केली आहे. या घटनेतील आणखी एक मुख्य सूत्रधार कृष्णा आंधळे हा अजूनही पसार आहे. कृष्णा आंधळे या प्रकरणात सापडल्यावर किंवा समोर आल्यावर घटनेचा आणखी उलगडा होण्याची शक्यता आहे.

### पाकिस्तानच्या पंतप्रधानांचा...

कम्युनिकेशन लॉक केलं. ८० विमानांच्या माध्यमातून भारतानं ६ ठिकाणी हल्ले केले. आम्ही ३ राफेल विमानं पाडली. ते पुढं म्हणाले की पहलगाम हल्ला खेदजनक आहे आणि पाकिस्तानचा या हल्ल्याशी दूरदूरपर्यंत संबंध नाही. आम्ही एका आंतरराष्ट्रीय चौकशीची मागणी केली होती, त्या चौकशीला आम्ही सहकार्य करण्याची ऑफर दिली, पण त्यांनी ऑफर मानली नाही.

### सद्गुरु बंकट...

घडवण्याचे काम बंकट स्वामी महाराजांनी केले. स्वातंत्र्याच्या अगोदर बहुजनातील सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना सांप्रदायाचा कीर्तन भजनाचा अधिकार दिला व जाती तोडा आणि समाज जोडा हा मोलाचा संदेश बंकट स्वामी महाराजांनी दिला. बंकट स्वामी संस्थांचा आज विकास होत आहे यात खारीचा वाटा म्हणून जो काही हातभार लावता येतो तो मी नेहमी संस्थानचा भक्त या नात्याने कायम सेवेत राहील असेही ते म्हणाले. यावेळी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पान ४ वरून पुढे...

### भारत पेट्रोलियम...

व केरोसीनचा इंधन पुरवठा केला जातो या आधी देखील या पेट्रोल पाईपलाईन मधून चोरी करण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले होते. मात्र यंदाही चोरी अगदी गुप्त पद्धतीने कोणालाही समजणार नाही अशा पद्धतीने करण्यात आली मनमाड ते मुंबई दरम्यान असलेली पाईपलाईन शेतकऱ्यांच्या शेतामधून आलेली आहे अनकवाडे शिवारात संपत चव्हाण या शेतकऱ्याच्या विहिरीत डिझेल पेट्रोल उतरल्याची माहिती कंपनीला मिळाली कंपनी तात्काळ शोध म्हणून सुरू केली मात्र याचा तपास लागला नाही यासाठी खास दिल्लीवरून डी. सी. व्ही.जी. मशिन द्वारे सर्वे करण्यात आला या सर्वेत चार ठिकाणी पाईपलाईन लिकेज असल्याची माहिती समोर आली मात्र दोन ठिकाणी केवळ पॅकिंग लिकेज असल्याने त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आली. मात्र याच ठिकाणी काही अंतरावर दीड इंची छिद्र करून टॅप मारून थेट पाईपलाईन द्वारे नळ कनेक्शन करतो त्याप्रमाणे ४८ फुटापर्यंत नळ कनेक्शन करण्यात आले व यातून रोज हजारो लाखो लिटर पेट्रोल डिझेल चोरी करण्यात आल्याची घटना समोर आली याबाबत कंपनीच्या वतीने अनुज नितीन धर्मराव, वय ३३ वर्ष, धंदा नोकरी, प्रबंधक आर. ओ. यु. मुंबई- मनमाड- बिजवासन पाईपलाईन नाशिक, रा. बी.पी.सी.एल. इन्स्टॉलेशन पानेवाडी ता. नांदगाव जि. नाशिक यांनी रीतसर फिर्याद दिली घटनेची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक विजय करे यांनी घटनास्थळी भेट दिली.

### लिंबागणेश येथे...

३ दशकांपासून भारत विरोधी दहशतवादी कारवायांचे केंद्र राहिलेले आहेत. याठिकाणी हल्ले करून दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करून पहलगाम येथील हल्ल्याचा बदला घेतला आहे.दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करणा-या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत कारवाई केलेल्या भारतीय सेना आणि भारतीय सरकारचा आम्हाला सार्थ अभिमान असुन आम्ही एकजुटीने पाठिशी असुन भारतीय परंपरेत कुंकुहे सौभाग्याचं लेणं मानलं जाते.पहलगाम हल्ल्यात काही नवविवाहित युवकांनी जीव गमावला.त्यांच्या विधवा पत्नींचे शोकाकुल चेहरे पाहून संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे ऑपरेशन सिंदूर मोहिमेची माहिती जगाला देणा-या दोन रणरागिनी भारत सरकारने पत्रकार परिषदेत माहिती दिली.यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्यासह लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि वायुदलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग याची माहिती देण्यासाठी निवड करत भारताच्या लेकी अतिरेक्यांना ठोस प्रतिउत्तर देऊ शकतात हा संदेश देण्यात आला. आज दि.८ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील मुख्य प्रवेशद्वारावर भारतीय सैन्य आणि भारत सरकारचे अभिनंदन करत भारत माता की जय,जय हिंद, भारतीय सेना जिंदाबाद,वंदे मातरम आदी घोषणाबाजी करत आतषबाजी करत विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव,भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे,माजी सरपंच कल्याण वाणी, विक्रांत वाणी,भगवान मोरे, दामोदर थोरात, विक्रम दाभाडे ,गणपत तागड,संतोष भोसले, सुदाम मुळे,अँड.गणेश वाणी, संजय घोलप,पांडुरंग वाणी, दादा गायकवाड,राजेभाऊ ढास, संजय सुकाळे, नितीन जाधव, शिवाजी शिंदे, शिवाजी रणखांब, बाजीराव दशमे, हरिओम क्षीरसागर आणि राम फाळके उपस्थित होते.

### धर्मवीर संभाजीराजे...

यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत कार्यकारिणी घोषित करण्यात आली. उपाध्यक्षपदी सतीश दाभाडे, विनोद सौदरमल, अवेज सेठ, सचिवपदी संदीप मडके, शिन बेद्रे,करण जाधव, सहसचिवपदी राहुल मोटे, किशोर वादे, कार्याध्यक्षपदी समाधान मस्के,महेश मोटे, सहकार्याध्यक्षपदी सोमनाथ गिरगे, बाबू गायकवाड, कार्यकारणी सदस्य म्हणून मुन्ना मोटे, मुकेश महाजन, शाम रुकर, सहकोषाध्यक्षपदी संतोष सुतार,मनोज हजारे, नविदभाई मशायक, विजय तावस्कर, भागवत घोडके यांची निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांचा छत्रपती संभाजीराजे मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आली.

### परळीत कर्कश...

शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्तपणे लक्ष्मी टावर बस स्थानक इटके कॉर्नर परळी उड्डाणपूल या ठिकाणी वाहतूक पोलीस पथकाने वाहन परवाना तपासणी चालू केली संचालक अलगद शिंच्या जाळ्यात सापडले पोलिसांनी पोलीस अचानक अवतरल्याने वाहन चालक अलगद पोलिसांच्या जाळ्यात सापडले सहातील नागरिकांना अनेक वर्षापासुन दिवसांनी अडवणे चौकशी करणे याची सवय नसल्याने अनेक वाहनचालकानी निमूदपणे दंड देत आपली सुटका करून घेतली. या विशेष कारवाईदरम्यान पोलिसांनी जवळपास १२७ वाहनावर कारवाई केली यात फॅन्सी नंबर विना कागदपत्रे दादा भाऊ अण्णा अशा फॅन्सी नंबर वाहनावर व नो पार्किंग झोन मधील वाहानावर कार्यवाही केली या मोहिमेत वाहन चालकावर ७२ हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली असून या कारवाईमुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे सुसाट वाहन चालकांना चाप बसण्यासाठी अशा कारवाईक करण्यात याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करत आहे. या कारवाईत बीड वाहतूक पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ पोहे अजिनाथ बांगर त्रिंबक कुडके बाळासाहेब नागरगोजे राम पवार पोना सचिन सारणिकर अजिनथ मुंडे परळी पोस्टचे पोहे सुर्यकांत मोरे चालक मदने असे सहभागी होते

### बांधकाम कामगारांचे...

भागात ग्रामविकास अधिकारी यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत. तसेच दि. ४ सप्टेंबर २०२४ रोजी मा. संगितादेवी पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना काढलेले आदेशाचे पत्र. जा. क्र. सा.प्र.वि. - ७/ पं अ का वि/ ३६३२/२०२४ असूनही गटविकास अधिकारी सही देत नसल्याने त्यामुळे शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळ या योजनेंतर्गत विविध कल्याणकारी योजना जसे की कामगारांच्या मुलांना व कुटुंबियांना मिळणा-या मुला मुलींच्या शिक्षणासाठी मदत, सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत, आरोग्य सुविधा यापासून वंचित असुन शासन स्तरावरून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आधिका-यांना ग्राम सेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दुर करण्यात यावी. या मागणीसाठी आज दि.८ मे गुरुवार रोजी हरिओम क्षीरसागर जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन करण्यात आले होते. यावेळी सिईओ जिल्हा परिषद बीड यांनी ग्रामसेवकांना लेखी आदेश पारित करावे अशी मागणी करण्यात आली. यावेळी आंदोलन स्थळी पंचायत समिती मार्फत ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर तसेच पोलीस प्रशासनामार्फत पोलीस अधिकारी बाबासाहेब डोंगरे, संतोष राऊत यांना लेखी निवेदन देऊन ठिय्या आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात आले.

### संत बंकटस्वामी...

काम कर्म अविद्या त्रिगुण पंचभुतांनी विणली रे । रक्त रेतु दुर्गंधी जंतु नरक मुतानें भरली रे ।।२।।

षडूविकार षडूवैरी मिळोनी तापत्रयानें विणली रे ।नवा ठायीं फ़ाटूनि गेली ती त्वां आम्हांसि दिधली रे ।।३।।

ऋषी मुनी ध्यातां मुखीं नाम गातां संदेहवृत्ती विणली रे । बापरखुमादेविवरु विठ्ठलें त्वत्पदीं वृत्ति मुरली रे ।।४।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले. यावेळी बोलताना बाळकृष्ण महाराज म्हणाले की वाणी पासून सर्व संत बंकटस्वामीची जन्म भूमी परम पवित्र आहे.संत बंकटस्वामी महाराज यांच्या दरबारात थापा मारून चालत नाही.. कधी कधी महालात जे सुख मिळत नाही ते सुख झोपडपीत मिळते.ज्या अवस्थेत आनंद ओसंडून वाहतो त्याला समाधान म्हणतात.बद्ध,जिज्ञासु ,मुमुक्ष्यु.. तीन अवस्था आहेत..मुमुक्ष्युअवस्था प्राप्त झाल्या शिवाय देव प्राप्त होत नाही.बंकटस्वामी महाराज मुमूक्षु अवस्थेला प्राप्त झालेले होते.भक्तीचा जन्म हृदय आणि ज्ञान हे बुद्धी मधून जन्मते. देवाचे स्वरूप आणि जीवाचे स्वरूप याचे घोगडीचे रूपक या अभंगात सांगितले..देवाला घोंगडी आवडते.

### शेतकऱ्यांनी सस्ती...

(महसूल) महाराष्ट्र राज्य यांनी शेत रस्त्यावर अवलंबित असलेली प्रकरणी एका महिन्यात निकाली काढण्याबाबत निर्देशाच्या अनुषंगाने तालुक्यातील शेतरस्ते,पाणंद अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे असल्याने.सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय यांच्याकडील निर्देशानुसार जिल्ह्यातील तालुकास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड होऊन जलद गतीने प्रकरणाचा निपटारा व्हावा व सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळोवेळी लोक आदालतीचे आयोजन करण्यात येते. त्याच धरतीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पंधरा दिवसातून एकदा एका ठिकाणी तहसील कार्यालयात आणि मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी 'सस्ती अदालत'या नावाने बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात 'सस्ती अदालत' हा उपक्रम राबविण्यासाठी महिन्यातील दुसरा व चौथा शुक्रवार या दिवशी राबविण्यात येणार आहे सबब शेतरस्ते,पांदण रस्तयाबाबत तक्रारी असलेल्या शेतक-यांनी या सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीड शहरातील विहिरी, बोअर अधिग्रहण करा : जगताप, मुळूक, गलधर

### • शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन




**बीड । प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात बीडकरांना महिनाभरापासून पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे नागरिकांमध्ये नगर पालिकेविरोधात संताप व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शहरातील खासगी विहिरी, बोअरचे अधिग्रहण करावे व संवेदनशीलतेने बीडचा पाणी प्रश्न सोडवावा,अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरात सध्या जाणवत असलेल्या पाणीप्रश्नावरही शिवसेना जिल्हाप्रमुखांनी जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

बीड शहरातील बहुतांश भागात अनेक महिन्यांपासून पंधरा ते वीस दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. मात्र भर उन्हाळ्यात महिनाभरापासून नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून विकतचे पाणी घेण्याची वेळ बीडकरांवर आली आहे. एकतर सध्या उन्हाच्या तीव्रतेने बीडकर हैराण झाले आहेत. त्यात सुरळीत पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक पुरते वैतागून गेले आहेत. उन्हाने जीवाची लाही लाही होत असताना तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. अशा परिस्थितीत पाणीटंचाई निवारणासाठी खासगी विहिरींचे अधिग्रहण करणे हा एक महत्त्वाचे उपाय आहे. बीडमध्ये देखील सध्याच्या पाणीटंचाईच्या काळात खासगी विहिरी, बोअर अधिग्रहित करण्याची गरज भासत आहे. शहरातील विहिरी आणि बोअर अधिग्रहण करून पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने या जलस्त्रोतांची नोंदणी करावी, अधिग्रहित केलेल्या जलस्त्रोतांचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी करावा, विहिरी, बोअर अधिग्रहण करण्यासाठी बीडसह प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार, मुख्याधिकारी यांना आदेशित करावे, बीडमध्येही नगर पालिकेमार्फत शहरातील पाणी असलेल्या विहिरी, बोअर यांचे अधिग्रहण करुन पाणी टंचाईदूर करण्यासाठी उपाययोजना करावी, शहरातील बंद पडलेले बोअर दुरुस्त करावे, जुन्या विहिरींचा गाळ काढावा अशी मागणी करण्यात आली. शहरात सध्या जाणवत असलेल्या पाणीप्रश्नावरही जगताप,मुळूक, गलधर यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली. काडीवडगाव येथील पाईपलाईनच्या कामाची नुकतीच पाहणी केली असल्याचे मुळूक यांनी जिल्हाधिकारी जॉन्सन यांना सांगितले. पाईपलाईनच्या चार पैकी तीन लिकेजचे काम पूर्ण झाले असून चौथ्या लिकेजचेही काम लवकर पूर्ण करुन शहराला पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

## भीषण पाणी टंचाई विरोधात शुक्रवारी होणाऱ्या हंडा मोर्च्यात शामिल व्हा: रूपालीताई देशपांडे

**बीड । प्रतिनिधी**



सध्या तीव्र उन्हामुळे उन्हाची तीव्रता वाढली असून बीड शहर व परिसरात बीड नगरपरिषद च्या हलगर्जी पणा मुळे मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे नागरिकांना पाण्यासाठी वन वन फिरावे लागतात येणाऱ्या शुक्रवारी ९ मे २०२५ रोजीच्या हंडा मोर्च्यास शरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शामिल व्हावे असे आव्हान समाजसेविका रूपाली देशपांडे यांनी केले. या बाबत पुढे बोलताना रुपाली देशपांडे यांनी सांगितले बिंदुसरा धरण व माजलगाव बँक वॉटर योजनेच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा केला जातो परंतु माजलगाव बँक वॉटर काडी वडगाव येथे अनेक दिवसापासून पाईपलाइन फुटून सुद्धा बीड नगरपरिषद दुर्लक्ष करत असल्याने शरातील नागरिक पाण्यासाठी वण वण फिरत असल्यामुळे बीड शरातील अनेक नगरसेवक सामाजिक कार्यकर्ते विविध पक्षातील नेत्याच्या उपस्थित दिनांक ९ मे २०२५ रोजी शुक्रवार वेळ सकाळी ११ वाजता बलभीम चौक ते बीड नगरपरिषद कार्यालयावर नागरिकांच्या पाणी संदर्भात हंडा मोर्चात शहरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आव्हान समाजसेविका रुपालीताई देशपांडे यांनी केले.

# पिंपरी (घाट) येथे नगर भोजनातून विषबाधा; 50 जण रुग्णालयात दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



अंबाजोगाई तालुक्यातील पिंपरी (घाट) गावात नगर भोजनाच्या कार्यक्रमानंतर सुमारे ५० जणांना विषबाधा झाली असून त्यांना तातडीने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, बुधवारी रात्री गावात नगर भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर पहाटेपासून अनेकांना उलट्या, मळमळ, पोटदुखी अशा तक्रारी जाणवू लागल्या. यानंतर ग्रामस्थांना घेऊन सरपंच काशिनाथ कातकडे यांनी त्वरित स्वाराती रुग्णालयाकडे धाव घेतली. अपघात विभागातील सीएमओ मारुती आंबाड, सर्व परिचारिका, कर्मचारी यांच्यासह राहुल (बाबा) गित्ते यांनी तातडीने रुग्णांना दाखल करून घेत उपचार सुरू केले.

सध्या सर्व रुग्णांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, आमदार धनंजय मुंडे यांनी रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधून बाधितांच्या प्रकृतीविषयी विचारपूस केली आणि योग्य त्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

# भाजपा युवा नेते अक्षय मुंदडांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाईत १३ मे रोजी 'चला हवा येऊ द्या' आणि 'मराठी पाऊल पढते पुढे' कार्यक्रमांचे आयोजन

### ▸ भाजप शहराध्यक्ष संजय गंभीरे व अमोल पवार यांची माहिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**





भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा १३ मे रोजी वाढदिवस असून त्या निमित्ताने अंबाजोगाई शहरात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये 'चला हवा येऊ द्या' आणि 'मराठी पाऊल पढते पुढे' यांचा समावेश असून अंबाजोगाई शहर तथा पंचक्रोशीतील नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपाचे अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय गंभीरे व युवक कार्यकर्ते अमोल पवार यांनी केले आहे.

दरम्यान कार्यक्रमाच्या पुर्व तयारीसाठी 'अक्षय' निवासस्थानी कार्यकर्त्यांची बैठक होवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध समित्या तयार करून जबाबदारींचे वाटप करण्यात आले आहे. हा भव्य कार्यक्रम शहरातील मध्यभागी असलेल्या सेंट एँन्थोनी स्कुलच्या मैदानावर घेतला जात असून व्यवस्थेतील प्रमुख पदाधिकार्यांनी त्या दृष्टीने मैदानाची काल पहाणी करीत रचना केली आहे. युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस तसं पहाता मोठ्या प्रमाणात साजरा करणे हे त्यांना स्वत:च मान्य नसते. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव व प्रेमापोटी यंदा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरविल्याचे संजय गंभीरे व अमोल पवार यांनी सांगितले. 'चला हवा येऊ द्या' हा कार्यक्रम विनोदी म्हणून ओळखला जातो. ज्यामध्ये निलेश साबळे, भाऊ कदम, सागर करांडे, कुशाल बद्रिके, भारत गणेशपुरे आणि श्रेया बुगडे आदींचा समावेश आहे. मागच्या दहा वर्षांपासुन हा कार्यक्रम खर्या अर्थाने महाराष्ट्राच्या घराघरात जावून पोहोचलेला असून तो पहाण्यासाठी लोकांची गर्दी देखील मोठ्या प्रमाणावर वाढते. 'झी मराठी'च्या वाहिनीवर मोठ्या प्रमाणावर रसिक कार्यक्रम पहातात. विनोदाची जुगलबंदी, मराठी गाण्यातून विनोदी विडंबन, वेगवेगळ्या वेशभुषेत कलाकारांची तुफान कॉमेडी याचे आकर्षण रसिकांना असते. 'थुकरटवाडी' हा त्यांचा विशेष कार्यक्रम गाजला असून महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात त्यांचे दौरे असतात. दरम्यान याच दिवशी 'मराठी पाऊल पढते पुढे' हा बहारदार गीतांचा कार्यक्रम देखील होणार असल्याचे ही संयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमाची शहरात जय्यत तयारी सुरू झाली. प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली 'अक्षय' निवासस्थानी बुधवार, दिनांक ७ मे रोजी घेण्यात आली. त्या बैठकीत कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा आणि त्यासाठी समित्यांची रचना करून प्रमुख पदाधिकार्यांना विविध जबाबदार्यांचे वाटप करण्यात आले. शहरात सेंट एँन्थोनी शाळेचे भव्य मैदान असून या ठिकाणी किमान सहा हजार रसिक-श्रोते यांना बसण्याची व्यवस्था तसेच अद्ययावत व्यासपीठ असणार आहे. सांस्कृतिक वारसा तथा साहित्य रसिकांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणार्या शहरात 'चला हवा येऊ द्या' आणि 'मराठी पाऊल पढते पुढे' हे दोन भव्य कार्यक्रम होणार असल्याने रसिकांच्या मनात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सध्या तरी कार्यक्रमाची शहरात जोरदार तयारी सुरू असल्याचे लक्षात येते. या मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या माध्यमातून विकासाची गंगोत्री शहरात आणि मतदारसंघात घेवून येण्यासाठी शासकिय पातळीवर पाठपुरावा करण्यात स्वत: अक्षय मुंदडांचा सिंहाचा वाटा असुन त्यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासात आमुलाग्र बदल झाल्याचे लक्षात येत आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शहराच्या कोनाकोपर्यातील रस्ते दर्जेदार सुमार झाल्याने सर्वत्र लोकांच्या मनातुन मुंदडा कुटुंबियांच्या बाबतीत कौतुकाचा वर्षाव होताना दिसतो. या कार्यक्रमाचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन भाजपचे अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय गंभीरे व अमोल पवार यांनी केले आहे.

## वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त अभिवादन सभेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह भारतात वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांची जयंती दि.९ मे रोजी साजरी केली जाते. त्यांचा जन्म मेवाड येथे ९ मे १५४० साली झाला होता. महाराणा प्रताप हे सिसोदिया कुळातील हिंदू पराक्रमी राजपूत होते. तथापि, ते नायक आणि योद्धा असूनही धर्म पारायण आणि मानवतेचे पुजारी होते. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून बीड येथील क्षत्रिय कुलवंत राजपुत समाज बांधवांच्यावतीने शहरातील यशवंत उद्यान परिसरात असलेल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास ठिक सकाळी ९ वा. अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व समाजातील बांधवांनी या अभिवादन सभेस उपस्थित रहावे असे आवाहन क्षत्रिय कुलवंत राजपुत समाज बांधवांच्यावतीने लक्ष्मणसिंह ठाकूर यांनी केले आहे. भारत ही शूर वीरांची जन्मभूमी आहे. अशा शूर वीरांपैकी एक आहेत महाराणा प्रताप. महाराणाचे पूर्वज मेवाडचे शासक आणि भगवान राम यांनी उत्पन्न केलेले सूर्यवंशी होते.

महाराणा प्रताप यांना लहानपनापासूनच राजवाड्यापेक्षा, सामान्य जनतेबरोबर वेळ घालायला जास्त आवडत असे. महाराणा प्रताप यांनी मुघल सम्राट अकबराविरोधात कडवा संघर्ष केला. त्यांनी कधीही अकबरासमोर शरणागती पत्कारली नाही. असे महान वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त क्षत्रिय कुलवंत राजपुत समाज बांधवांच्यावतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले असून सर्व समाजातील बांधवांनी या अभिवादन सभेस उपस्थित रहावे.

# बेस्टची होणार भाडेवाढ, वाचा खिशावर येणार ताण

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईकरांसाठी जीवनवाहिनी ठरलेल्या बेस्ट बस सेवेबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या बेस्ट उपक्रमाला सावरण्यासाठी प्रशासनाने तिकीट दरात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेनेही या निर्णयाला मंजुरी दिली असून, ८ मे २०२५ पासून (गुरुवारपासून) ही दरवाढ लागू होणार आहे. बेस्ट प्रशासनाने यासंदर्भात अधिकृत परिपत्रक जारी करून ही माहिती दिली आहे.

परिपत्रकानुसार, बेस्ट उपक्रमाच्या प्रवास भाडे सुसूत्रिकरणाला बेस्ट समिती आणि महापालिकेने मंजुरी दिली असून, त्याची अंमलबजावणी आता केली जात आहे. त्यामुळे आता प्रवाशांना प्रवासासाठी दुप्पट भाडं मोजावं लागणार आहे. उदा. ५ किमी अंतरासाठी आधी ५ रुपये असलेलं भाडं आता १० रुपये, आणि एसी बससाठी ६ रुपयांचं तिकीट आता १२ रुपये इतकं होणार आहे. याशिवाय मासिक पासच्या दरातही लक्षणीय वाढ करण्यात आली आहे.



नवे तिकीट दर (साध्या बससाठी)
५ किमी – ₹१०, १० किमी – ₹१५
१५ किमी – ₹२०, २० किमी – ₹३०

एसी बसचे नवे तिकीट दर
५ किमी – ₹१२ (पूर्वी ₹६)
१० किमी – ₹२० (पूर्वी ₹१३)
१५ किमी – ₹३० (पूर्वी ₹१९)
२० किमी – ₹३५

मासिक पासचे दर (साध्या बससाठी)
५ किमी – ₹८०० (पूर्वी ₹४५०)
१० किमी – ₹१२५०
१५ किमी – ₹१७०० (पूर्वी ₹१६५०)
२० किमी – ₹२६००

एसी बसचे पास दर– ५ किमी – ₹११००
१० किमी – ₹१७०० (पूर्वी ₹१४००)
१५ किमी – ₹२३०० (पूर्वी ₹२१००)
२० किमी – ₹३५०० (पूर्वी ₹२७००)

बेस्टने शेवटचं भाडेवाढीचं पाऊल २०१८ मध्ये उचललं होतं, तेव्हा साध्या बससाठी किमान भाडं ₹८ आणि एसीसाठी ₹२० करण्यात आलं होतं. मात्र २०१९ मध्ये तत्कालीन महापालिका आयुक्त प्रवीण परदेशी यांनी भाडं कमी करून अनुक्रमे ₹५ आणि ₹६ केलं होतं. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या सह्याद्री अतिथीगृहातील बैठकीत बेस्टच्या आर्थिक संकटावर चर्चा झाली होती. त्यात भाडेवाढीचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. यानंतर महापालिका आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी अधिकृतरित्या दरवाढीला मंजुरी दिली.

## सततच्या अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान

**मुंबई । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून हवामानात बदल होताना दिसतोय. राज्यातील काही भागांमध्ये पुढील पाच दिवसांसाठी अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आलाय. आज मुंबईमध्येही काही भागांमध्ये पावसाने वादळी वाऱ्यासह हजेरी लावलीये. कधी पाऊस तर कधी ऊन अशी परिस्थिती संपूर्ण राज्यात आहे. भर मे महिन्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडतोय. अनेक ठिकाणी गारपिटीचा देखील इशारा देण्यात आला. विदर्भात काही शहरांमध्ये पावसाचा फटका बसतो तर काही ठिकाणी उन्हाचे चटके जाणवत आहेत. मार्च महिन्यापासूनच राज्यात अवकाळीचे सावट कायम आहे. या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. नाशिकमध्ये काही दिवसांपूर्वीच गारपिट झाली आणि फळ बागांचे नुकसान झाले. पुढील काही दिवस राज्यात अवकाळीचे ढग कायम असण्याचे संकेत आहेत. जून महिन्याला सुरूवात होण्यास वेळ आहे. मात्र, त्यापूर्वीच पाऊस सुरू आहे. विदर्भासह मराठवाड्यात मुसळधार पावसाने हजेरी लावलेली असतानाच आता भारतीय हवामान खात्याने मोठा इशारा दिला आहे. राज्यात अवकाळीला पोषक वातावरण बघायला मिळतंय. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, बीड, धाराशिव, लातूर, हिंगोली, जालना या ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला.


### जाहीर प्रगटन

**मा.श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश–४, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. :– ९३/२०२५**

अर्जदार–१. नारायण पि. सर्जेराव सुपेकर, वय ४२ वर्षे, धंदा शेती २. पुजा पि. नारायण सुपेकर, वय : १६वर्षे, ३. समर्थ पि. नारायण सुपेकर, १३ वर्षे, सर्व रा. मु.पो. साक्षाळपिंप्री, ता. जि.बीड

विरूद्ध

गैरअर्जदार–महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

**मागणी– अज्ञानाचे पालनकर्ता म्हणुन नियुक्ती करण्याची परवानगी मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार १. नारायण पि. सर्जेराव सुपेकर, वय ४२ वर्षे, धंदा शेती, २. पुजा पि. नारायण सुपेकर, वय : १६ वर्षे, ३. समर्थ पि. नारायण सुपेकर, १३ वर्षे, सर्व रा. मु.पो. साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदार के १ यांची मुलगी नामे **पुजा पि. नारायण सुपेकर, वयः १६ वर्षे व मुलगा नामे समर्थ पि. नारायण सुपेकर, वय १३ वर्षे,** यांचे नावावरील मौजे साक्षाळपिंप्री, ता. जि.बीड येथिल गट क ६०५ मधिल क्षेत्र ०० हे. १३ आर हि सदर मिळकत अज्ञानांचे नावे असलेली विकी/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. प्रकरणातील पुढील तारीख २१/०६/२०२५.

**(अर्जदारातर्फे वकिल :–ॲड. एल. आर. गंगावणे, बीड.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती पी डी चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ७९६ / २०२५**

**गोदावरी कैलास मोमीन व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :– १. गोदावरी कैलास मोमीन, वय ६४ वर्षे, धंदा–घरकाम, रा. नाळवंडी नाका, बीड ता. जि. बीड २. उषा भ्र. शिवाजी शिदि, वय – ३७, वर्षे, धंदा–घरकाम, रा. मु. पुणदगाव ता. माजलगाव जि. बीड. ३. सुक्शला भ्र. बाबासाहेब शेरकर, वय – ३३ वर्षे, धंदा – घरकाम, रा. मु शुती निमगाव पो. सोन्नाथडी ता. माजलगाव जि. बीड ४. नंदिनी पि. कैलास मोमीन, वय – ३५ वर्षे, धंदा – घरकाम, रा. नाळवंडी नाका, बीड ता. जि. बीड, ५. अनुराधा भ्र. दिनेश थोरात, वय–२९ वर्षे, धंदा घरकाम, रा. आदर्श नगर, ता. परतुर जि. परभणी. ६. भागवत पि. कैलास मोमीन, वय – ३० वर्षे, धंदा – खाजगी नौकरी, रा. नाळवंडी नाका, बीड ता. जि. बीड, ७. आदित्य पि. कैलास मोमीन, वय– २६, वर्षे, धंदा – मजुरी, रा. नाळवंडी नाका, बीड ता. जि. बीड, (अर्जदार है भारतीय आहेत)

विरुद्ध निरंक

**मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कैलास पि. एकनाथ मोमीन यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत कैलास पि. एकनाथ मोमीन** यांचा मृत्यु दिनांक ०९.०४.२०२४ रोजी कोथरुड हॉस्पीटल पुणे येथे नैसर्गिकरित्या झाला असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ ते ५ या मयताच्या मुली आहेत. व अर्जदार क ६ व ७ हे मयताचे मुले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते. की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कैलास पि. एकनाथ मोमीन यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ मे २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २० जुन २०२५.

**(मार्फत– ॲड. एस ए बुदेले)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ७५८/२०२५**

**शितल विरूध्द निरंक**

अर्जदार १. शितल भ्र. उमेश कदम, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, २. प्रथमेश पि. उमेश कदम, वय – ०९ वर्षे, धंदा– शिक्षण, ३. श्रावणी पि. उमेश कदम, वय ०४ वर्षे, धंदा काही नाही, ४. रुक्मिणी भ्र. बन्सीधर कदम, वय ६९ वर्षे, धंदा घरकाम,सर्व रा. गवारी, पो. मांजरसुंबा, ता. जि. बीड.

**मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत उमेश बन्सीधर कदम मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत उमेश बन्सीधर कदम यांचा मृत्यु दिनांक ०४/०२/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत उमेश बन्सीधर कदम यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत उमेश बन्सीधर कदम** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०५/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २०/०६/२०२५ आहे.

**(मार्फत– ॲड. गणेश शिंदे)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

CMYK
दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.०९ मे २०२५ पान ४

## शेतकऱ्यांनी सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगरला भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांशी तक्रारी या शेतरस्ते, पाणंदरस्ते वरील अतिक्रमणाबाबत असल्याचे निदर्शनास आल्याने या विषयाबाबत बीड जिल्ह्यातील सर्व सबंधित नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता वेबिनारचे आयोजन करण्यात येऊन संबंधित नागरिकांसोबत संवाद साधण्यात आला. त्यामधील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा सहभाग शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करून देण्याच्या अनुषंगाने मागणी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी मामलेदार मधील तरतुदी मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके तसेच मंत्री, ▶▶ उर्वरित पान २ वर

# सर्व विभागांनी ३१ मे पूर्वी पावसाळा पूर्व तयारी पूर्ण करावी : जिल्हाधिकारी जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

सर्व विभागांनी त्यांच्या कक्षेत असलेल्या पावसाळापूर्व कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत तसेच येणाऱ्या पावसाळ्यात नागरिकांसाठी शासन यंत्रणेची सज्जता ठेवून पावसामुळे हानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले. येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी सर्व विभागांनी करावयाच्या कामांचा आढावा जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी पूर्व तयारी बाबत माहिती दिली. जनजागृती करा – पावसाळा सुरू होताना जिल्ह्यात अनेक ठिकाणी वीज पडण्याच्या घटना होतात. गावपातळीवर पडणाऱ्या विजेपासून बचाव करण्याच्या उपायांबाबत




जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पातळीवर ग्रामसभामधून याबाबत माहिती देणे तसेच गावा-गावात जनजागृती पर संदेश लावणे, भिंतीपत्रके या माध्यमातून लोकांना माहिती देता येईल असे ते म्हणाले. जिल्ह्यात ३०६ गावे नदी काठावर वसलेली आहेत तथापि गेवराई तालुक्यातील ३२, माजलगाव तालुक्यातील २६ आणि परळी वैद्यनाथ तालुक्यातील ५गावांना नदीच्या पुराचा धोका आहे. बीड शहरात देखील सन २००६ आणि सन २०१६ मध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. या सर्व गावात आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत देण्यात आलेले बचाव साहित्य सुस्थितीत असल्याबाबत खात्री करून घ्यावी तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन याचे पूर्ण नियोजन करावे असे श्री जॉन्सन म्हणाले. पुराचा धोका असलेल्या गावांमध्ये पुरेसा अन्नसाठा असणे आवश्यक आहे तसेच पावसामुळे पसरू शकतील अशा आजारांवरील औषधे देखील ग्रामीण रुग्णालय स्तरावर असतील याची खात्री करावी. पावसाळ्यात साप चावण्याचे प्रकार घडू शकतात त्यामुळे ग्रामीण रुग्णालयात त्या संदर्भातील लस उपलब्ध करून ठेवा असे जिल्हाधिकारी म्हणाले. काही ठिकाणी अतिवृष्टी होऊन नुकसान होते अशा ठिकाणी आदेशाची वाट न बघता तालुक्यातील कृषी अधिकारी व तलाठी यांनी तात्काळ पंचनामे करावे असेही निर्देश जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी दिले. पावसात वीज पुरवठा सुरळीत राहील तसेच रस्त्यावरील वाहतूक उत्तम पद्धतीने सुरू राहील याची खबरदारी यांनी सांगितले.

## भारत पेट्रोलियम कंपनीच्या पाईपलाईन मधून कनेक्शन करून इंधन चोरी

**मनमाड । प्रतिनिधी**

Bharat Petroleum कंपनीच्या मुंबई ते मनमाड या पाईपलाईनला थेट टॅप करून नळ कनेक्शन करतो त्याप्रमाणे थेट पाईपलाईनद्वारे दूरपर्यंत कनेक्शन करण्यात आली तब्बल ४८ फूटपेक्षा जास्त पाईपलाईन लावून नळ कनेक्शन जोडतो त्याप्रमाणे जोडून त्या पाईपलाईन मधून हजारो लिटर डिझेलची चोरी करण्यात येत होती काल एका शेतकऱ्याच्या विहिरीत डिझेल उतरल्याने त्याचा तपास करत असताना अत्याधुनिक मशीनद्वारे



ही चोरी उघडकीस आली मात्र ही चोरी कोणी केली, हे हे समजले नसून कंपनीच्या अधिकाऱ्यांतर्फे अज्ञात व्यक्ती विरोधात मनमाड शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक विजय कुमार करे यांनी अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करून गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असेकी मनमाडला भारत पेट्रोलियम इंडियन ऑइल हिंदुस्थान पेट्रोलियम या इंधन कंपन्यांचे इंधन प्लांट आहेत या इंधन प्लांटमध्ये पेट्रोल डिझेल केरोसीन यांचा साठा करून उत्तर महाराष्ट्र सह मराठवाडा व विदर्भातील काही जिल्ह्यांना येथून इंधनपुरवठा केला जातो मनमाडच्या भारत पेट्रोलियम या ठिकाणी थेट मुंबई ते मनमाड पाईपलाईन टाकण्यात आली असून या पाईपलाईन द्वारे पेट्रोल डिझेल ▶▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश येथे ऑपरेशन सिंदूर विजयाचा जल्लोष साजरा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

२२ एप्रिल जम्मू कश्मीर येथील पहलगाम या ठिकाणी पाक धार देण्यात दहशतवाद्यांनी २६ निष्पाप भारतीय पर्यटकांचे निर्गुण पणे हत्या केली होती. पहलगाम हल्ल्यातील पीडितांना न्याय देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय सैन्य दलांनी लढाऊ विमाने आणि ड्रोनद्वारे क्षेपणास्त्राचे हल्ले करण्यात आले.या कारवाईत जैश -ए- मोहम्मद, लष्कर



-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांची युवकांची भरती,त्यांचे प्रशिक्षण, दहशतवाद्यांना भारतामध्ये घुसवण्यासाठी लॉन्चिंग पॅडम्हणून वापरात येत असलेल्या काश्मीरमधील ५ आणि पाकिस्तान मधील ४ अशा एकुण ९ तळ जे गेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## धर्मवीर संभाजीराजे जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील छत्रपती संभाजीराजे मित्र मंडळच्या वतीने आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीची बैठक होऊन धर्मवीर संभाजीराजे जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी गेवराई तालुक्याचे युवानेते पृथ्वीराज पंडित यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीला दीपक आतकरे,सतीश दाभाडे,



विलास ठाकूर, दत्ता दाभाडे शिवनाथ परळकर, अक्षय कालवडे, सोमनाथ गांडुळे, शरद वादे ▶▶ उर्वरित पान २ वर




*बीड: सपा सेंटरवर जशी बीड शहर पोलीस अधीक्षक यांनी कारवाई केली आहे तसेच बस स्टँड समोरील तीन ते चार लॉटरी पडदा लावून चक्री चालू आहे लॉटरीच्या नावाखाली चक्री चालू आहे यांच्यावरही कारवाई करावी अशी नागरिकांमध्ये चर्चा चालू आहे*

## संत बंकटस्वामी महाराज यांनी किर्तन मर्यादा आणि शुद्ध कीर्तन परंपरा सांगितली : बाळकृष्ण महाराज वसंतगडकर



**बीड । प्रतिनिधी**

वारकरी सांप्रदायातील वै.सद्गुरू जोग महाराज आणि सद्गुरू बंकटस्वामी महाराज गुरु शिष्याची आदर्श जोडी आहे.संत बंकटस्वामी महाराज यांनी किर्तन मर्यादा आणि शुद्ध कीर्तन परंपरा सांगितली.असे प्रतिपादन श्री ह भ प बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांनी केले..संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, अयोध्येतील राम मंदिराचे पुजारी पंडित गजानन ज्योतकर गुरुजी.. श्री ह भ प केशव महाराज गित्ते.श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश



महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.

वारकरी संप्रदायातील महानसंत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या .. कान्होबा तुझी घोंगडी चांगली । आम्हांसी कां दिली वांगली रे ।।धृ।।

स्वगत सच्चिदानंद मिळोनी शुद्ध सत्त्व गुण विणली रे ।

षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुन्दरा शोभली रे ।।१।।

▶▶ उर्वरित पान २ वर

## परळीत कर्कश आवाज करणाऱ्या वाहना सह नो पार्किंग वाहनावर कारवाई

### जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांचे संयुक्त पथक कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत यांच्या आदेशानुसार अप्पर अधीक्षक चेतना तिडके अप्पर अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली परळी पोस्टचे पो नि नाचन स पो नि सुभाष सानप जिल्हा वाहतूक शाखा व परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने परळी शहरातील कर्कश आवाज फॅन्सी नंबर प्लेटनो पार्किंग झोन मधील वाहने लावणाऱ्या वाहनावर धडक कारवाईची मोहीम सुरू केल्याने वाहन चालकात खळबळ माजली आहे परिसरातील परळी शहरातील धूम स्टाईल वाहने चालवणाऱ्यामुळे अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत नागरिकांनी मागणी करू नये पोलीस कुठलीही कारवाई या वाहनचालकावर करीत नसल्याचा आरोप परळीकर करीत होते मात्र अचानक दिनांक बुधवार ७/५/२०२५ रोजी वाहतूक शाखा व परळी ▶▶ उर्वरित पान २ वर

## बांधकाम कामगारांचे ठिय्या आंदोलन : सिईओ जिल्हा परिषद यांनी लेखी आदेश पारीत करण्याची मागणी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी देऊ नये याबाबत बीड जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीने प्रत्येक ग्रामसेवकांना लेखी आदेश काढले असून, यामुळे बांधकाम कामगारांचे नुकसान होत असून नूतनीकरण रखडलेले आहे. बीड पंचायत समितीच्या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण गेल्या ९ महिन्यांपासून रखडले असुन बांधकाम कामगार (नुतनीकरण) पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असुन प्रत्येक वर्षी नोंदणी करणे गरजेचे आहे. मात्र यासाठी ९० दिवस काम केलेल्या प्रमाणपत्रावर ग्रामीण

▶▶ उर्वरित पान २ वर



● जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लवकरात लवकर सर्व ग्रामसेवकांना ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रकावर स्वाक्षरी देण्यासाठी लेखी आदेश पारित करावे. – रामभाऊ बादाडे ( कोषाध्यक्ष असंघटित मजदूर पंचायत बीड जिल्हा )

● तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी आदेश काढून देखील त्याची अंमलबजावणी नाही, ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात यावी. – हरिओम क्षीरसागर ( जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ बीड )



CMYK